**महाराष्ट्र शासन**

क्रमांक :टिपीबी-४३१९/२६०/प्र.क्र.१४६/२०१९/नवि-११
नगर विकास विभाग, ४ था मजला,
मंत्रालय, मुंबई -३२.
दिनांक : १३/०९/२०१९.

प्रति,
**आयुक्त**
बृहन्मुंबई महानगरपालिका.

विषय :- Applicability of provision 33(7)(A) & 33(7)(B) to on going proposal of redevelopment of existing buildings.

संदर्भ :- आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे अर्धशासकीय पत्र क्र. MCP/ ६२३९, दि. २२/७/२०१९.

महोदय,

संदर्भित पत्राचे कृपया अवलोकन व्हावे.

सदर प्रकरणी आपणास खालीलप्रमाणे स्पष्टीकरण कळविण्याबाबत मला आदेश आहेत.

बृहन्मुंबई प्रारुप विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ ही कलम २६ अन्वये दि.२७/०५/२०१६ रोजी प्रसिध्द झालेनंतर महापालिकेस पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर होऊन विकास नियंत्रण नियमावली, १९९१ नुसार मंजूरी प्राप्त करुन विद्यमान इमारती तोडण्यात आलेल्या प्रकरणी जर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ चे विनियम ३३(७)(A) / विनियम ३३(७)(B) मधील तरतुदीनुसार पुनर्विकास अनुज्ञेय करणेबाबतच्या इतर तरतूदींची (Except existing building) पुर्तता होत असेल तर अशा प्रकरणी विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ चे विनियम ३३(७)(A) / विनियम ३३(७)(B) मध्ये रुपांतरण खालील अटी सापेक्ष अनुज्ञेय करणेस हरकत नाही.

**अट :-**

१) वरीलप्रमाणे रुपांतरणास परवानगी देण्याचे अधिकार आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना राहतील.

२) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका हे अशा रुपांतरणाला लागू करतील त्या अटींची पुर्तता करणे प्रकल्प प्रवर्तकास बंधनकारक असेल."

३) महानगरपालिकेने दिलेली विकास परवानगी ही महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाचे कलम ४८ अन्वये वैध असल्याबाबतची खात्री महानगरपालिकेने करावी.

**आपला,**

( निर्मलकुमार पं. चौधरी )
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत :- १) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई.
३) निवडनस्ती (नवि-११)